जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
Address – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in Ph.020 / 26122478

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**
**प्रेस नोट दि.२९/०७/२०२३**
**दि.२८/०७/२०२३ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे**

## भाग-१ ते ५ चे गुन्हे

**१**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | शिवाजीनगर पो.स्टे.१५८/२०२३,भादविक २७९,३३८,३०४ (अ) मो.वा.कायदा ११९/१७७,१३४ |
| **फिर्यादी** | निखिल वांद्रे वय २३ वर्षे रा.पौंड फाटा पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात मोटार सायकलस्वार (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक १३/०६/२०२३ रोजी रात्रौ २२/३० वा.चे सुमारास सदगुरू जंगली महाराज मंदीर समोरून पायी रस्ता ओलाडत असताना सार्वजिक रोडवर |
| **तपशिल** | यातील नमुद इसमाने त्याचे ताब्यातील मोटार सायकल ही वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून, हयगयीने, अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी फिर्यादी यांचे वडील भरत वामन वांद्रे वय ५५ वर्ष रा.फ्लॅट नं.१२०२ मयुरेश विहार पौंड फाटा पुणे हे सदगुरू जंगली महाराज मंदीर समोरून पायी रस्ता ओलाडत असताना त्यांना धडक देऊन त्यांच्या उजवे पायास जबर दुखापत करून अपघाताचे ठिकाणी न थांबता,अपघाताची खबर न देता गंभीर जखमी करून,त्याचे मृत्युस कारणीभुत होवुन,पळुन गेला. (अ.मयत र.नंबर ३०/२०२३ सी.आर.पी.सी.१७४ चे झाले तपासा वरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.) |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.शेख मो.नं.९६०४७११८५० |

**२**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सायबर पो.स्टे.१२५/२०२३,भादविक ४१९,४२०,५०६,३४,सह आयटी अॅक्ट ६६सी,६६डी |
| **फिर्यादी** | एक महिला वय ५९ वर्षे रा.कर्वेनगर पुणे |
| **आरोपीत** | मोबाईल धारक तसेच स्काईप वापरकर्ते (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील नमुद मोबाईल धारक यांनी फेडेक्स कंपनी मुंबई येथुन बोलत आहे असे सांगुन फिर्यादी यांचे पार्सल कस्टम डिपार्टमेंट मध्ये अडकले असुन त्यामध्ये ६ खोटे पासपोर्ट ५ क्रेडीट कार्ड ४० ग्रॅम एमडीएमए ड्रग असल्याचे सांगुन एनसीबी डिपार्टमेंट मुंबई येथे एफआयआर दाखल केली आहे असे सांगुन फिर्यादी यांचे बँक खाते स्केनिंग करण्याचे बहाण्याने २०,८१,६३४/-रु बँक खात्यात भरण्यास सांगुन फिर्यादी यांची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.निरी.सावंत मो.नं.९५११६७५९६१ |

**३**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | लोणीकंद पो.स्टे.६१४/२०२३,भादविक ४५७,३८० |
| **फिर्यादी** | योगेश जाधव वय ३१ वर्ष,रा.केसनंद ता.हवेली जि.पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २७/०७/२०२३ रोजी रात्रौ २२/०० वा.ते दिनांक २८/०७/२०२३ रोजी सकाळी ०५/०० वा.चे दरम्यान मौजे केसनंद गावचे हद्दीतील अमर चौक केसनंद येथील फिर्यादी व साक्षीदार यांचे घरामध्ये |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा व शेजारी राहणारे साक्षीदार यांचे घराचा कोयंडा कोणीतरी अज्ञात इसमाने कशानेतरी उचकटुन व कट करुन त्याव्दारे आत प्रवेशकरुन फिर्यादी यांचे घरामधील रोख रक्कम १८,०००/- रुपये,टी.व्ही,मोबाईल असा ३३,०००/- रुपये व साक्षीदार यांचे सोन्याचे दागिने असा एकुण १,०३,००/-रूपये किमतीचा ऐवज घरफोडी चोरी करून नेला आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी.गोडसे मो.नं.८०८२०७७१०० |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**